**आजच्या आज वाटणे.** **पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती**

**तहकूब सभा परिपत्र.**

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा **(बुधवार दिनांक १५/७/०९ रोजी तहकूब केलेली )** सभा **शुक्रवार दिनांक १७/७/०९ सकाळी ११ : ३० ( साडे अकरा )** वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्रमांक ७, बुधवार दि.८/७/०९ वरील खालील विषयांचा विचार होईल.**

विषय क्रं. ६७

**मा. राजेंद्र गोरडे व मा. राजेंद्र वागसकर यांचे दि. २/७ /०९ चे पत्र.**

पुणे शहराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला असून नागरीवस्तीही मोठ्या प्रमाणावर शहरी भागात व ग्रामीण भागात झाली आहे. त्यामुळे मलनि:स्सारण व पाणीपुरवठा या अत्यावश्यक सेवेवर मोठ्या प्रमाणावर ताण पडत आहे. मलनि:स्सारण संदर्भात काही ठिकाणी आपण शुध्दीकरण केंद्र उभारून शुध्द केलेले पाणी नदी मध्ये सोडले जाते. शहराच्या वाढत्या नागरिकांमुळे पिण्याच्या पाण्याची मागणी सतत वाढत आहे. त्याच बरोबर जुन्या लाईन्समधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळतीही होत आहे. तसेच नव्या पाण्याच्या लाईन्स टाकताना त्यामध्ये योग्य प्रमाणात व योग्य दाबाने पाणी येणार आहे की नाही याचीही काळजी घेतली जात नाही. या सर्व प्रकारामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. पाण्याचा वापर हा काटकसरीने व योग्य प्रकारे करावा ही काळाची गरज आहे. यासाठी विकास आराखडा करताना रस्त्याची लांबी किती रूंदी किती ठेवावी याचा विचार केला जातो, त्याप्रमाणे संपूर्ण पुणे शहराचा पाणी पुरवठयासाठी आराखडा तयार करण्यात यावा. यामध्ये पाणी वितरण व्यवस्था कुठल्या भागात किती व्यासाची लाईन टाकावयाची, पाणीपुरवठ्याची वेळ काय असणार आहे, किती दाबाने पाणी सोडण्यात येणार आहे. इत्यादी संपूर्ण गोष्टीचा विचार करावा. अशाच प्रमाणे मलनि:स्सारण संदर्भातही आराखडा तयार करण्यात यावा. हा आराखडा तयार झाल्यावर त्यामध्ये कोणाच्याही सांगण्यावरून बदल करण्यात येऊ नये. ड्रेनेज प्रोजेक्टसाठी महानगरपालिकेने काही तज्ञांची सेवक म्हणून नेमणूक केली आहे. त्यांचेकडे हे काम दिल्यास आणखी सोईचे होईल.

तरी ड्रेनेज व पाणीपुरवठा संदर्भात आराखडा तातडीने करण्यात यावा.

विषय क्रं. ६८

पुणे महानगरपालिकेच्या व्हेईकल डेपो विभागाकडील विविध पदावरील सेवकांच्या बढतीने नेमणूका करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अमआ(वि)/उआ/सेवि/१५६, दिनांक २०/६/२००९ चे पत्र.

विषय क्रं. ६९

विकास नियंत्रण नियमावलीमधील बायोटेक्नोलॉजी पार्क या आरक्षणाचे एम.आर.टी.पी.ॲक्ट ३७ (१) व १५४ अन्वये फेरबदल करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /नगरअभि /१६७,दि. २६/६/२००९ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७०</u>**

पुणे पेठ पाषाण स.क्र.१३४ येथील विट भट्टी झोन मधील काही भागाचे रूपांतर बगीच्या आणि खेळाचे मैंदान या आरक्षणा मध्ये करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ /१३६, दिनांक १०/६ /०९ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७१</u>**

पुणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) (अे अे ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेली सूचना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील परिशिष्ट आर–७ मध्ये अ.क्र.८ येथे ई.डब्ल्यू.एस.हौसिंगकरिता असलेला नियम सुधारित करणेबाबत फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/९२, दि. २९/५/२००९ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७२</u>**

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील नियोजित विभागणी ,आराखडा मंजूर करतानाच्या नियमामध्ये सुधारणा करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करण्याबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१३४०, दि. ४/२/०९ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७३</u>**

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक निमसार्वजनिक विभागातील क्षेत्रावर काही अटीवर वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबत. एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१२०६, दि. १३/१/२००९ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७४</u>**

खराडी स.नं. ७१ व ६९ चे हद्यीवरील ३० मी. डी. पी. रस्त्यापासून ते खराडी वाघोली हद्यीवरील ६० मी. डी.पी. रस्त्यापर्यत स.नं. ६९,६८,६६ आणि ६७ मधून बी.पी.एम.सी. ॲक्ट कलम २०५ नुसार १८ मीटर ( ८० फुट ) रस्ता आखणेबाबत मा. बापू पठारे व मा. सौ. सुमन पठारे यांचे दि. २९/४/०८ च्या पत्रावर शहर सुधारणा समिती ठ.क्र.२५ दिनांक ६/५/०८ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी जा. क्रं. मआ/नअ/५९०, दिनांक ४/०९/०८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**